**नि. क्रि.केस नं. ११३/२०२३**

महाराष्ट्र शासन वि. शहाजी उर्फ बंडा बाबूराव सांगले

**निशाण नं. २० /क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – संगिता शिवाजी सांगले

वय – ४५ वर्षे

धंदा – शेती

राहणार – अंबाबाई तिबीले गल्ली, कोडोली ता. पन्हाळा जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे सुरु,</u>**

१.शिवाजी सांगले हे माझे पती आहेत. सदर घटनेची तारीख व वेळ मला आठवत नसल्यामुळे सांगता येणार नाही. घटनेदिवशी मी व माझे पती आम्ही दोघेच घरी होतो. त्या दिवशी माझे पती दारात उभे होते. त्यावेळी आरोपी याने माझ्या पतींना घरात येऊन मारहाण केली. त्या दिवशी आरोपी याने माझ्या पतींना जमिनीवर आपटले हाताने ढकलले त्यामुळे ते जमिनीवर पडले. त्यामुळे माझ्या पतीच्या मणक्याला मार लागला. त्यावेळी आरोपी मला म्हणाला की, तुला मारणार तुझे हातपाय मोडणार. माझ्या पतीला त्यावेळी मार लागल्यामुळे त्यांना उचलण्याजोगी परिस्थिती नव्हती. त्यानंतर आमचा मुलगा घरी आला त्यानंतर आम्ही पतीवर घरी आठवडाभर उपचार केले माझे पती उठू शकत नव्हते म्हणून माझ्या पतीला घेऊन आम्ही सी.पी.आर हॉस्पीटल येथे गेलो. तेथून आम्ही डी.वाय.पाटील हॉस्पीटल येथे गेलो. डी.वाय.पाटील हॉस्पीटल येथे माझ्या पतीच्या मणक्याचे ऑपरेशन करण्यात आले. माझे पती डी. वा. पाटील हॉस्पीटल येथे १५ दिवस होते. सदर घटनेनंतर डी. वाय. पाटील हॉस्पीटल येथे उपचार घेईपर्यंत माझ्या पतीला उठता येत नव्हते. त्यानंतर डी. वाय. पाटील हॉस्पीटल येथून उपचार घेऊन आम्ही त्यांना घरी आणले. तरीदेखील माझ्या पतींना निटसे उठता येत नव्हते. आम्ही त्यांना आधार देऊन उठवत होतो. ज्याने माझ्या

पतीला सदर प्रकारे मारहाण केली त्यास पाहिल्यास मी ओळखू शकते. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. व्ही. ए. पाटील यांचे मार्फत सुरु,</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, घाटगे डॉक्टर हे आमच्या गावातील डॉक्टर असून त्यांचेकडे आम्ही पतीला घेऊन जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे दारु पीत असल्यामुळे त्यांना जेवण कमी जात होते म्हणून डॉक्टरांकडे जात होते. घाटगे डॉक्टर यांना आम्ही घटना झाल्यानंतर आम्ही घरी बोलवत होतो. आमचे घर दोन खोल्यांचे आहे. सदर घटना घडली त्यावेळी मी घरात जेवण करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी चपात्या लाटत असताना मला आवाज आला म्हणून मी बाहेर आले.

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझा जबाब दवाखान्यात घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांना जबाब देताना "आरोपी याने माझ्या पतींना जमिनीवर आपटले हाताने ढकलले त्यामुळे ते जमिनीवर पडले. त्यामुळे माझ्या पतीच्या मणक्याला मार लागला. त्यावेळी आरोपी मला म्हणाला की, तुला मारणार तुझे हातपाय मोडणार. ” असा मजकूर मी सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याने माझ्या पतींना जमिनीवर आपटले हाताने ढकलले त्यामुळे ते जमिनीवर पडले. त्यामुळे माझ्या पतीच्या मणक्याला मार लागला. त्यावेळी आरोपी मला म्हणाला की, तुला मारणार तुझे हातपाय मोडणार असे आहे तसे शब्द माझ्या जबाबात नमूद नाहीत. तसे शब्द माझ्या जबाबात का नमूद आहेत याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात आरोपी याने हाताने ढकलून माझ्या पतीला खाली पाडले व मारहाण केली असे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब घेताना पोलिसांनी काही गोष्टी लिहील्या आहेत व काही गोष्टी लिहिलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांकडे मी माझा जबाब चुकीचा घेतला होता म्हणून मी तक्रार केली नव्हती.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती डी. वाय. पाटील हॉस्पीटल येथे उपचार घेत असताना मी त्यांच्या सेवेसाठी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे माझ्या पतीच्या डोक्याचे स्कॅनींग

करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथील डॉक्टरांनी माझ्या पतीची एक बाजू पॅरालाइज झाल्याचे सांगितले होते. त्या वेळी माझ्या पतींना नीटसे बोलता येत नव्हते. माझ्या पतीच्या डोक्यात रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना बोलता येत नाही असे डॉक्टरांनी सांगितले नव्हते.

५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे आम्ही घाटगे डॉक्टरांकडे आठ दिवस उपचार घेतले. हे म्हणणे खरे नाही की, ८ दिवस उपचार घेत असताना आम्ही कोणत्याही प्रकारची तक्रार दिली नव्हती. कोडोली पोलीस स्टेशन येथे जाऊन मी दोन ते तीन दिवसाने तक्रार दिली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पेशंटला सोडून जाता येत नसल्यामुळे मी ती तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारीतील मजकूर पोलिसांना मी सांगितला होता. मी त्यावेळी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्यानंतर अंगठा केला होता.

६. माझे पती कधी कधी दारु पीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतींना कोणालातरी थांबवून मग घरी आणावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती दारु पीत असल्यामुळे त्यांचे शरीर थकले होते त्यांना नीटसे काम जमत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती दारु पीत असल्यामुळे कामाला जात नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेल्या मजकूर माझ्या मुलाने सांगितलेला होता.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात वर्णन केल्याप्रमाणे आरोपी आले व त्यांनी हाताने ढकलले असे माझ्या पतीने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात वर्णन केलेला कोणताही प्रकार घडलेला नव्हता. आरोपीची आई आक्काताई सांगले या आमच्या मामी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आक्काताई व आमच्या घरात येण्याजाण्याचा एकच रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती दारु पिवून येणाऱ्या जाणाऱ्यांना शिव्या देतात असे तेथील लोक सांगत होते. हे म्हणणे खरे नाही की, आक्काताई सांगले यांनी मला तुझे पती दारु पिवून शिव्या देतात असे सांगितले होते. आक्काताई सांगले यांनी माझ्या पतीच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

७.     हे म्हणणे खरे आहे की, वाटेवरून व सांडपाणी जाण्यावरून आरोपी व आमचेमध्ये वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटेवरून वाद असल्यामुळे आरोपीविरुद्ध मी व माझे पतीने तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, डी. वाय. पाटील हॉस्पीटल येथे माझा जबाब घेतला नव्हता.

८.     हे म्हणणे खरे आहे की, घाटगे डॉक्टर यांना मुकामार लागला त्यामुळे पतीला गोळया व इंजेक्शन द्या असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, घाटगे डॉक्टर यांना माझ्या पतीला मारहाण झाली आहे असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने माझ्या पतींना कोणत्याही प्रकारची मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी माझ्या पतीला मारहाण केली होती म्हणून पतीला मदत करण्याच्या हेतूने आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची आई आक्काताई सांगले यांनी माझ्या पतीविरुद्ध दिलेली तक्रार मागे घेतल्यास माझी त्यांच्याविरुद्ध तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पतीला मदत करण्याच्या हेतूने आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/–

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. ०६.०८.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा